# महिलादिनानिमित्त मुकुल माधव फाऊंडेशनतर्फे आरोग्य शिबीर

▶ रत्नागिरी (*शहर वार्ताहर*)

आंतरराष्ट्रीय महिला दिनाचे औचित्य साधून फिनोलेक्स पाईप्स यांच्या सामाजिक बांधिलकीमध्ये सहभागी असणारी मुकुल माधव फाऊंडेशन आणि परकार हॉस्पिटल अॅण्ड रिसर्च सेंटर, रत्नागिरी यांच्यावतीने स्त्रियांच्या स्तनाचे कर्करोग निदान शिबीर ८ ते १५ मार्च या कालावधीमध्ये सकाळी १० ते ४ वाजेपर्यंत परकार रुग्णालय रत्नागिरी येथे आयोजित करण्यात आले आहे.

या शिबिराची सुरुवात परकार रुग्णालय येथे रविवारी करण्यात



आली. पहिल्याच दिवशी महिलांकडून चांगला प्रतिसाद मिळाला. गेल्या वर्षी मुकुल माधव फाऊंडेशन आणि फिनोलेक्स पाईप्स यांचे श्रेयाने महिलांसाठी रत्नागिरी येथे कर्करोगाची चिकित्सेकरीता सुविधा होण्याच्या दृष्टीने परकार रुग्णालयात यांना मॅमोग्राफी आणि कोलोस्कॉपी यंत्र देणगी स्वरुपात उपलब्ध करून देण्यात आले आहे. या शिबिराच्या कालावधीमध्ये ३५ वर्षावरील महिलांची चाचणी होणार आहे. प्रशांती कॅन्सर केअर मिशन, पुणेचे कॅन्सरतज्ज्ञ डॉ. सी. बी. कोप्पीकर हे परकार रुग्णालयात नियमित उपस्थित राहणार आहेत. तसेच चिकित्सांचे अहवाल व मूल्यांकन हे प्रशांती कॅन्सर केअर टीम, पुणे यांच्यामार्फत ऑनलाईन होणार आहे. या शिबिरात सवलतीच्या दरात चिकित्सा करण्यात येणार आहे. फिनोलेक्स पाईप्सने प्रथम येणाऱ्या २०० गरीब गरजू महिलांना या शिबिरामध्ये चिकित्सेकरीता सहभागी होणेकरीता स्वेच्छेने प्रायोजकत्व घेतले असून, जास्तीत जास्त महिलांनी या शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन मुकुल माधव फाऊंडेशनच्यावतीने करण्यात आले आहे.